# तुम्हारे खत में हमारा सलाम !

## शासनाच्या 'आनंद शिधा' मोफत वाटपात कृषिमंत्री सत्तार यांची राजकीय पेरणी

**सुहास सरदेशमुख, लोकसत्ता**

**औरंगाबाद :** 'आनंदाचा शिधा' पोहोचलाच नसल्याची तक्रार शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासमोर रविवारी पीक पाहणी दौऱ्यात झाली, तेव्हा कृषिमंत्र्यांच्या सिल्लोड मतदारसंघात 'आनंदाचा शिधा' मोफत देण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली होती. जेवढ्या शिधापत्रिका तेवढी रक्कम प्रत्येकी शंभर रुपयाने मंत्री सत्तार यांनी पुरवठा विभागात भरली आणि 'आनंदाचा शिधा' मोफत वाटप केला. गरिबांची दिवाळी 'सत्तार सेठ' यांच्यामुळे गोड झाली हे सांगायला अब्दुल सत्तार मित्रमंडळाचे कार्यकर्ते खास फिरत होते. साखर, रवा, हरभरा डाळ आणि तेल या चार वस्तू मोफत दिल्याचा प्रचार करत मंत्री सत्तार यांनी 'तुम्हारे खत में हमारा सलाम' हे त्यांच्या बोलण्यातील चार शब्द जशास तसे अमलात आणल्याची चर्चा सिल्लोड मतदारसंघात रंगली आहे.

शिवसेनेतील बंडाळीनंतर 'पन्नास खोके एकदम ओके' हे जणू घोषवाक्य व्हावे अशी परिस्थिती ग्रामीण भागातही निर्माण झाली होती. या चर्चेमुळे मतदारसंघात मोठे मेळावे घेण्यापासून ते मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये शक्तीप्रदर्शनही घडवून आणण्यात आले. अब्दुल सत्तार यांच्या शक्तिप्रदर्शनात तर मतदार हे एवढे आपल्या बाजूचे आहेत की 'कुत्ता' चिन्ह दिले तरी आपण निवडून येऊ शकतो, असे अब्दुल सत्तार यांनी आपल्याला सांगितले होते, असा उल्लेख मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला होता. मतदारांची हीन शब्दाने हेटाळणी होत असल्याने हा शब्द उच्चारावा की नको याविषयी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेही साशंक होते. मात्र, जाहीर सभेतील तो उल्लेख अभिमानाचा वाटावा असा मिरविल्यानंतर मंत्री सत्तार यांनी पुरवठा विभागाची 'आनंद शिधा' ही योजनाच स्वतःच्या प्रचारासाठी वापरण्यास सुरुवात केली. शिधाधारकाने शंभर रुपये भरुन शिधा घ्यावा, अशा सूचना होत्या. ही रक्कम मंत्री सत्तार यांनी भरल्याचा अब्दुल सत्तार मित्रमंडळाचा दावा आहे. शिधापत्रिकाधारकांना मोफत शिधा देण्याच्या उपक्रमाचे छायाचित्रही आता समाजमाध्यमांवर फिरत आहे.

ग्रामीण भागात कृषी संकट अधिक तीव्र होत असताना दिवाळीत 'आनंद शिधा'च्या माध्यमातून राजकीय पेरणी केली जात आहे. पुरवठा विभागाच्या माध्यमातून उत्तम मतदारबांधणी होते हे उत्तर प्रदेश निवडणुकीतून पुढे आल्यानंतर आता राज्यातही हे प्रारूप जोर धरू लागले आहे. सिल्लोड आणि सोयगाव या दोन तालुक्यांच्या सिल्लोड विधानसभा मतदारसंघात चार लाख ६२ हजार ६२६ शिधापत्रिकाधारक आहेत. त्या प्रत्येकापर्यंत आता 'मी एकनाथ शिंदे समर्थक' लिहिलेले किट आणि मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या प्रतिमा असणारा शिधा आता पोहोचला आहे.

कोणत्याही निवडणुका जाहीर नसताना राज्य सरकार सतत निवडणूक वातावरण कायम राहील असे वातावरण निर्माण करत असल्याची प्रतिक्रिया राजकीय पटलावर उमटू लागली आहे.

# शिक्षकांना मुख्यालयी राहण्याच्या अध्यादेशाला खंडपीठात आव्हान

## वित्त व ग्रामविभागाचे सचिव, विभागीय आयुक्तांना नोटीस

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**औरंगाबाद :** जिल्हा परिषदेच्या शिक्षक, कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहण्याची सक्ती करण्याच्या संदर्भात शासनाने काढलेल्या अध्यादेशाला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात आव्हान देणारी याचिका दाखल करण्यात आली असून याप्रकरणी न्या. रवींद्र घुगे व न्या. संजय देशमुख यांनी राज्याच्या वित्त विभागाचे व ग्रामविकास विभागाचे सचिव, संबंधित विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्रा.) यांना नोटीस बजावून उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी २८ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

याप्रकरणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे उस्मानाबाद शाखेचे जिल्हाध्यक्ष विलास कंटेकुरे यांनी ॲड. सईद एस शेख यांच्यामार्फत याचिका दाखल केली आहे. याचिकेनुसार पूर्वीचे शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदांच्या कर्मचाऱ्यांना घरभाडे भत्तासाठी कामाच्या ठिकाणी राहण्याची अट शिथिल करण्यात आलेली होती. मात्र वित्त विभागाने ७ ऑक्टोबर २०१६ रोजी, ग्रामविकास विभागाने ९ ऑक्टोबर २०१९ रोजी काढलेल्या अध्यादेशातून जिल्हा परिषदांचे शिक्षक, कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी राहण्याचे अनिवार्य करण्यात आलेले आहे. ज्यामुळे संबंधित शिक्षक, कर्मचारी तसेच त्यांच्या कुटुंबावर अन्याय होत आहे.

इतर शासकीय कर्मचाऱ्यांना शासकीय घरे, निवासस्थाने, सदनिका उपलब्ध असतात. परंतु जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना अशी सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांना खाजगी घरेच भाड्याने घ्यावी लागतात. अनेक शाळा या दुर्गम ग्रामीण भाग, वस्ती, तांडा आदीं ठिकाणी असून स्थानिक लोकांचेही पक्के घरे नसताना शिक्षकांना कामाच्या ठिकाणी राहणे अशक्य आहे.

एखाद्या कर्मचाऱ्याच्या कुटुंबात पती-पत्नी नोकरीवर असल्यावर कोणाच्या मुख्यालयी राहावे याबाबत शासन निर्णयात स्पष्टता नाही. शैक्षणिक वर्षामध्येच बढती किंवा बदलीच्या परिस्थितीत काय करावे, याबाबत शासन निर्णयात कोणतेच मार्गदर्शन करण्यात आलेले नाही.

कुटुंबाच्या शैक्षणिक, आरोग्य तसेच इतर गरजांसाठी शिक्षकांना तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी राहावे लागते. संबंधित शिक्षक, कर्मचारी तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी राहत असले तरी ते आपले कर्तव्य निष्ठापूर्वक बजावत आहेत. ज्यामध्ये सार्वजनिक वाहतूक व्यवस्था किंवा खाजगी वाहनाने शिक्षक, कर्मचारी कामाच्या ठिकाणी दररोज वेळेवर किंवा वेळेपूर्वी न चुकता पोहोचून आपले कर्तव्य पार पाडत आहेत. तरीही संबंधित शिक्षकांच्या चौकशींचे आदेश देण्यात येत आहेत. अशा स्थितीत अस्पष्ट व मोघम शासन निर्णयाची अंमलबजावणी करणे कर्मचाऱ्यांवर अन्यायकारक ठरेल, असेही याचिकेत म्हटले आहे.

यावर खंडपीठाने प्रतिवादींना नोटीस तसेच उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणात याचिकाकर्ता यांच्या वतीने ॲड. सईद एस. शेख, तर शासनाच्या वतीने साहाय्यक सरकारी वकील एस. जी. कार्लेकर यांनी काम पाहिले.

# स्वच्छता साहित्याच्या गोदामाला औरंगाबादमध्ये भीषण आग

**लोकसत्ता प्रतिनिधी**


औरंगाबाद शहरातील साफसफाई, स्वच्छता साहित्याच्या गोदामाला मंगळवारी पहाटे आग लागली. या वेळी गोदामातील स्वच्छतेचे साहित्य आगीत खाक झाले.

**औरंगाबाद :** येथील चेलीपुरा भागातील काचीवाडा येथे साफसफाई व स्वच्छतेचे साहित्य ठोक पद्धतीने विक्री करणाऱ्या एका गोदामाला मंगळवारी पहाटे आग लागली. या आगीत झाडू, खराटे, फिनेल आदी वस्तूंसह इतर साहित्य जळून खाक झाले. आग विझवण्यासाठी तब्बल चार तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आग विझवण्यात यश आले असून या घटनेत सुमारे एक कोटींचे साहित्य जळून खाक झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असल्याची माहिती अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

गोदामातील आगीची हाळ लागून लगतच्या चार ते पाच घरांमधील साहित्याचेही नुकसान झाले आहे. यामध्ये नजीकच्या घरांमधील टीव्हीसह इतरही साहित्य निकामी झाले असून भिंतीनाही तडे गेल्याची माहिती अग्निशमन विभागाकडून देण्यात आली.

या संदर्भात अधिक माहिती देताना अग्निशामक केंद्र अधिकारी अजिज यांनी सांगितले,की चेलीपुरा भागातील शेख रशीदभाई यांच्या गोदामाला आग लागल्याचा फोन पहाटे ३.५५ वाजता आला. पदमपुरा अग्निशमन केंद्रातील एक बंब रवाना झाला. हरि घुगे, अग्निशमन अधिकारी सुरे आदींचे प्रथक रवाना झाले. मात्र ज्वाळांचे लोळ पाहता सिडको, चिकलठाणा येथूनही बंबांना पाचारण करण्यात आले. आठ अग्निशामक बंब, सहा पाण्याचे टँकर व एक जेसीबी आणावा लागला. आग विझवण्यासाठी तीन ते चार तास लागले. घटनास्थळी सिटी चौक पोलीस ठाण्याचे निरीक्षक यांच्यासह अनेक उच्च पदस्थ अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही भेट देऊन पाहणी केली.

# फटाके फोडताना सोळा मुले भाजून जखमी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**औरंगाबाद :** शहर व परिसरातील विविध भागात दिवाळीच्या पहिल्याच दिवशी लक्ष्मीपूजनावेळी फटाके फोडताना सोळा मुले भाजून जखमी झाली. यातील सहा मुलांवर उपचार सुरू असून त्यातील काहींना उपचारानंतर घरी पाठवण्यात आल्याची माहिती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या (घाटी) सूत्रांकडून मिळाली. दरम्यान, काही मुलांना किरकोळ इजा झालेली असली तरी फटाक्यांसारख्या घातक आणि नुकसानकारक प्रकाराबाबत दाखवण्यात आलेली बेपर्वाई अंगलट आली आहे.

औरंगाबाद शहरात सोमवारी उत्साहात लक्ष्मीपूजन साजरे करण्यात आले. या वेळी लहान मुलांपासून ते मोठ्यांपपर्यंत सर्वांनीच फटाके फोडून दिवाळी साजरी केली. पण याचवेळी औरंगाबाद जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणी काही दुर्घटना घडल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे मंगळवार सकाळपर्यंत एकूण १६ जण फटाके फोडताना भाजले असल्याचे समोर आले आहे, ज्यात ६ मुलांचा देखील समावेश आहे. यापैकी अनेकांवर औरंगाबादच्या घाटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

कुणाला हाताला, तर कुणाच्या तोंडाला इजा झाली असून, काहींचा डोळाही थोडक्यात बचावल्याचे दिसून आले. दरम्यान, एका घटनेत औरंगाबाद शहरातील मिसारवाडी भागातील १० वर्षाच्या मुलाच्या चेहरा आणि डोळ्याला फटाके फोडताना इजा झाली आहे. त्याच्यावर औरंगाबादच्या घाटी रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.

सोमवारपासून मंगळवारपर्यंत एकूण १६ जणांनी घाटी रुग्णालयात उपचार घेतले आहेत.

### फटाके फोडताना काळजी घ्या

दिवाळीत फटाके फोडताना काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. विशेष म्हणजे लहान मुलांवर फटाके फोडताना लक्ष दिले पाहिजे. शक्य असल्यास इजा पोहोचवणारे फटाके मुलांना देऊ नयेत. तसेच सर्वच फटाके फोडताना अंतर ठेवावे. सोबत जवळच पाणी, वाळू ठेववी. तसेच हातात फटाके फोडण्याचे धाडस करणे टाळावे, असेही प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे.

### भर बाजारात फटाक्यांची विक्री

गुलमंडीसह इतरही अनेक ठिकाणी फटाक्यांची विक्री करणारे हातगाडे दिसून येत आहेत. याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे. औरंगाबाद शहरात चिकलठाणा भागातील कलाग्राम व कर्णपुरा देवीच्या परिसरातील मैदानासारख्या बाजारपेठेपासून दूर असलेल्या ठिकाणी फटाक्यांची स्वतंत्र बाजारपेठ तयार करण्यात आलेली असली तरी काहींनी हातगाड्यांवरच विक्री सुरू केली आहे.

# तीन वर्षांनंतर दिवाळीनिमित्त शास्त्रीय संगीताच्या मैफिलींची पर्वणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**


दिवाळी पहाट कार्यक्रमांतर्गत शास्त्रीनगर गृहनिर्माण संस्थेने स्थानिक उद्यानात पंडित अजित कडकडे यांची शास्त्रीय, भाव-भक्तिगीतांच्या कार्यक्रमाची मैफील आयोजित केली होती.

**औरंगाबाद :** खास दिवाळीनिमित्त शहरात वेगवेगळ्या भागात सांगीतिक मैफिलींचे आयोजन करण्यात आले असून तीन वर्षांच्या खंडानंतर कानसेन लाभलेल्या पर्वणीचा आनंद घेत आहेत.

फराळ आणि गोडधोडाच्या पदार्थांच्या घमघमाटासोबतच शास्त्रीय संगीताच्या मैफिलींमधून सांस्कृतिक भूक भागवणे ही सांगीतिक मेजवाणीचे आयोजन करून मराठ-मोळी संस्कृती रुढ झालेली आहे. मागील दोन वर्षांमध्ये करोनाकाळात तर त्यापूर्वीच्या वर्षात विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचारातील गोंगाटामुळे सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन होऊ शकले नाही. कार्यकर्ते, पदाधिकारी निवडणुकीच्या कामांमध्ये गुंतल्यामुळे दिवाळीच्या दरम्यान शास्त्रीय, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले गेले नव्हते. मात्र, आता शहरात विविध संस्था, गृहनिर्माण संस्था, मंडळांकडून प्रख्यात गायकांच्या, वादकांच्या मैफिलींचे आयोजन करण्यात आले आहे.

दिवाळी पहाट कार्यक्रमांतर्गत सोमवारी पंडित अजित कडकडे यांच्या शास्त्रीय, भाव-भक्तिगीतांच्या कार्यक्रमाची मैफील येथील शास्त्रीनगर गृहनिर्माण संस्थेने स्थानिक उद्यानात आयोजित केली होती. सर्वांसाठी खुला असलेल्या या कार्यक्रमास सुमारे पाचशेपेक्षा अधिक कानसेन पहाटेच दाखल झालेले होते. पंडित कडकडे यांनी प्रारंभी तुम जागो मोहन प्यारे ही चिज गाऊन मैफिलीची सुरुवात केली. त्यानंतर गणपतीवरील स्तुती गीत, मन लोभले मनमोहन, निघालो घेऊन दत्ताची पालखी, लंगडा रे लंगडा आदी गाजलेली गीते त्यांनी सादर केली.

मसाप परिसरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात दिवाळीच्या पूर्वसंध्येला अभिजात दीपसंध्या हा पंडित गिरीश जोशी व त्यांच्या शिष्यांच्या गायकीने रंगलेला शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास डॉ. श्रीरंग देशपांडे, संजीवनी डहाळे, विकास वैद्य, अतुल दिवे, अजित देशपांडे आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. बंदिश, निर्गुणी भजने आदी यावेळी सादर करण्यात आली.

# रानडुकराच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू; कोल्ह्याचाही सात जणांना चावा

## वन्य प्राण्यांच्या त्रासाने शेतकरी त्रस्त

**लोकसत्ता वार्ताहर**

**हिंगोली :** दिवाळीच्या दिवशी शेतावर रोजमजुरीने कामावर गेलेल्या बोथी येथील निर्मला डुकरे यांच्यावर डुकराने केलेल्या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची चर्चा सुरू असतानाच शेवाळा शिवारात मंगळवारी कोल्ह्याने सात जणांना चावा घेतला. या लोकांची प्रकृती गंभीर असल्याने त्या सर्वांना नांदेड येथील रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले आहे. दिवसेंदिवस वन्यप्राण्यांकडून होणाऱ्या हल्ल्याने शेतकरी मात्र त्रस्त झाला असून त्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी वाढत आहे.

जिल्ह्याच्या कळमनुरी तालुक्यातील बोथी येथे सोमवारी सकाळी कोंडबाराव काळे यांच्या शेतात सोयाबीन काढण्यासाठी रोजमजुरीने गेलेल्या निर्मलाबाई दत्तराव डुकरे यांच्यावर डुकराने हल्ला केल्याने त्या गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांना आखाडा बाळापूर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी आणले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. ऐन दिवाळीच्या दिवशीच रोजंदारीने कामावर गेलेल्या निर्मलाबाईचा डुकराने केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाल्याने बोथी गावावर शोककळा पसरली होती.

अशीच आणखी एक घटना मंगळवारी घडली. कळमनुरी तालुक्यातील शेवाळाशिवारात कयाधू नदीच्या बाजूलाच काही गावकऱ्यांचे शेत आहे. त्यामुळे बहुतांश गावकरी सकाळी शेतात चक्कर मारण्यासाठी जातात, तर काही गावकरी या भागात फिरण्यासाठीही येतात. नेहमीप्रमाणे काही गावकरी शेतात चक्कर मारण्यासाठी जात असताना, पिसाळलेल्या कोल्हयाने रस्त्याने जाणाऱ्या गावकऱ्यांवर हल्ला करण्यास सुरुवात केली. या हल्ल्यात सात जण जखमी झाले. यामध्ये संजय सावंत, शंकर मारोती सूर्यवंशी, दीपक लक्ष्मण सूर्यवंशी ,सीमा दत्तराव सूर्यवंशी, युवराज मुधकर नरवाडे व अन्य दोघांचा समावेश आहे.

कोल्ह्याने या सर्वांच्या पायाला चावा घेतल्याचे सांगण्यात आले असून त्यांना तातडीने उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नांदेडला हलविण्यात आले आहे. या सर्वांची प्रकृती सुधारत असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, वन विभागाने या भागात असलेल्या पिसाळलेल्या कोल्ह्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी शेतकरी करत आहेत.


MANAPPURAM FINANCE LTD.
CIN-L65910KL1992PLC006623,
IV/470A (old)W638A(New), Manappuram House,
Valapad, Thrissur, Kerala - 680 567.

**लिलावाची नोटीस**

विशेषकर गिरवीकर्ताओं और सामान्य रूप में जनता को एतद्द्वारा सूचित किया जाता है कि निम्नलिखित अकाउंट्स में रखे गए सोने के आभूषणों की सार्वजनिक नीलामी निम्नलिखित शाखाओं पर दिनांक 16.11.2022 को सुबह 10.00 बजे से किया जाएगा. हम ऐसे डिफॉल्टर ग्राहकों के सोने के आभूषणों की नीलामी करने जा रहे हैं जिन्होंने रजिस्टर्ड पत्र द्वारा सूचित किए जाने के बावजूद अपने लोन की रकम नहीं चुकाई है. जिन आयटम्स की नीलामी नहीं हो पाएगी, उनकी नीलामी किसी अन्य दिन बिना पुन: सूचना दिए की जाएगी. नीलामी के स्थान व तिथि (अगर कोई हो) में परिवर्तनों की कोई सूचना नीलामी केन्द्र या वेबसाइट पर लगाई जाएगी तथा इस बारे में कोई अन्य सूचना नहीं दी जाएगी.

गिरवियों की सूची :
धुळे, गांधीचौक धुळे 126040700026449, 6465, 6625, 6993, 7003, 7063, 7124, 7127, 7140, 7144, 7151, 7172, 7178, 7184, 7185, 7186, 7197, 7202, 7210, 7212, 7214, 7216, 7218, 7222, 7229, 7231, 7235, 7248, 7258, 7265, 7276, 7300, 7301, 7305, 7318, 7321, 7322, 7325, 7332, 7333, 7337, 7338, 7339, 7342, 7348, 7361, 7365, 7368, 126040730013414, 3445, 3578, 3663, 3919, 4084, 4116, 4145, 4164, 4177, 4209, 4216, 4219, 4222, 4242, 4250, 4264, 4265, श्रीपुर धुळे 134060700016708, 6712, 7128, 7143, 7147, 7164, 7166, 7170, 7176, 7179, 7180, 7182, 7192, 7200, 7208, 7218, 7221, 7223, 7236, 7248, 7259, 7265, 7281, 7288, 7294, 7304, 7305, 7306, 7325, 7328, 7331, 7332, 7333, 7337, 7338, 7345, 7349, 7350, 7351, 134060730007982, 8006, 8048, 8314, 8335, 8337, 8360, 8363, 8367, हिंगोली हिंगोली 138310700001165, 1186, 1242, 1258, 1266, 1279, 1282, 1482, 1516, 138310730001470, 1498, 1702, 1769, 1834, सरदार बाजार हिंगोली 134780700009250, 9261, 9265, 9281, 9283, 9289, 9298, 9301, 9319, 9346, 9361, 9395, 9494, 9504, 9524, 9529, 9554, 9571, 9579, 9592, 134780730011588, 1639, 1645, 1655, 1694, 1885, 1898, 1904, 1919, 1937,

उपरोक्त नीलामी में भाग लेने के इच्छुक व्यक्तियों को निम्नलिखित का पालन करना होगा:- इच्छुक बोलीकर्ताओं को ईएमडी के रूप में रू.10,000/- नीलामी के दिन नकद जमा कराना होगा (असफल बोलीकर्ताओं को बाद में लौटा दिया जाएगा). बोलीकर्ता को वैध पहचना प्रमाण/पैन कार्ड साथ लेकर आना होगा. अधिक जानकारी के लिए कृपया 9072604049 पर संपर्क करें.

अधिकृत अधिकारी
मणप्पुरम फायनेंस लि. हेतु.



**Sale Notice**

**M/S BETON CONCRETE PRODUCTS PRIVATE LIMITED (IN LIQUIDATION)**
**(CIN: U65990MH1984PTC031901)**
Reg. office: PASAYADAN, 412, N-3, CIDCO, AURANGABAD MH 431003 IN

**E-Auction**
Sale of Assets under Insolvency and Bankruptcy Code, 2016
**Date and Time of E-Auction: Tuesday, 15 November 2022 at 3.00 pm to 5.00 pm**
(With unlimited extension of 5 minutes each)

Sale of Assets and Properties owned by **BETON CONCRETE PRODUCTS PRIVATE LIMITED (IN LIQUIDATION)** situated at Gut No: 223/1/2 C (Old) New Gut No: 223/1/2/F Revenue Village: Khadka, Taluka: Newasa, District: Ahmednagar (Land not owned by the Corporate Debtor) forming part of Liquidation Estate formed by the Liquidator, appointed by the Hon'ble National Company Law Tribunal, Mumbai Bench vide order dated 22 September 2021 (order received on 30 September 2021). The sale will be done by the undersigned through the e-auction platform https://e-auction.123done.in/

INR.

| Asset | Reserve Price | EMD Amount | Incremental Value |
|---|---|---|---|
| Plant & Machinery | 37,67,750/- | 3,76,775/- | 1,00,000/- |

*Taxes extra

Terms and Condition of the E-auction are as under
1. E-Auction will be conducted on **"AS IS WHERE IS"**, **"AS IS WHAT IS"** and **"WHATEVER THERE IS" BASIS'** through approved service provider M/s Augeo Asset Management Company (123done.in)
2. For the purpose of participating in the auction, the intending bidders are required to deposit EMD amount through DD/ NEFT / RTGS in the account **"BETON CONCRETE PRODUCTS PRIVATE LIMITED in Liquidation", Account No. : 016230100003900, Bank: Janata Sahakari Bank Limited IFSC Code: JSBP0000016.**
3. Bidders shall make independent enquiries prior to submitting their bid and submit bids online in the prescribed format available on website https://e-auction.123done.in/ Please Contact : Mr. Shekhar Singh at +91- 9711522275 / 7428993244; shekhar.singh@123done.in bh1@123done.in
4. Interested bidders will have to upload their KYC documents along with the EMD submission details on https://e-auction.123done.in/ **before 5:00 PM of 14 November 2022.**
5. The name of the eligible bidders will be identified by the Liquidator to participate in e-auction on the portal https://e-auction.123done.in/ The e-auction service provider (www.123done.in) will provide User id and password by email to eligible bidders.
6. E-auction date & Time : **Tuesday, 15 November 2022 from 3.00 p.m. to 5.00 p.m.** (with unlimited extension of 5 min)
7. The bidding will start from the reserve price, in case, a bid is placed in the last 5 minutes of the closing time of the e-auction, the closing time will automatically get extended for 5 minutes with unlimited extension.
8. The bidder who submits the highest bid amount on closure of e-Auction process shall be declared as the Successful Bidder and a communication to that effect will be issued through electronic mode which shall be subject to approval by the Liquidator. The highest bid does not entitle the bidder to claim as a successful bidder. The liquidator's decision in this case would be final.
9. Upon the communication by the Liquidator to the successful bidder through e-mail / any other electronic mode, the successful bidder shall be required to further deposit 10% of the bid amount within 2 working days and balance sale consideration be paid within 30 days of the e-auction. Failure to deposit such amount shall result in the forfeiture of amount deposited as initial EMD and the bidder with the 2nd highest bid in value shall be declared as the successful bidder thereafter. The process shall continue until the payment of further deposit by the bidder. The initial EMDs paid by the remaining bidders shall be refunded within a period of 15 days from the date of e-auction.
10. The properties mentioned above can be inspected by the prospective bidders at the site with prior contacting **Mr. Shekhar Singh: +91-9711522275.**

Sd/-
**Anagha Anasingaraju**
**Liquidator**
**Email rp.anagha@kanjcs.com**
**Regn. No: IBBI/IPA-002/IP-N00247/2017-18/10732**
**Office: 1-2, Aishwarya Sankul,**
**G A Kulkarni Path, Opp. Joshi Railway Museum,**
**Kothrud, Pune 411038.**

**Date : 25 October 2022**
**Place : Pune**



लोकसत्ता
Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.









**भविष्यविषयक**

**ॲस्ट्रॉलॉजी:** गोल्ड मेडलिस्ट, जन्मकुंडली बनविणे, जुळविणे, जन्मकुंडलीवरून तसेच हस्तरेषा - चेहरा, फोटोवरून आपल्या प्रश्नांवर सविस्तर भविष्य तसेच वास्तुशास्त्राचे महत्त्व, वास्तुशांतीचे साधे-सोपे उपाय ५० पानांवर लिहून मिळतील. पाहिजे असल्यास हिंदी/ इंग्रजीमधून लिखाण मिळेल. (प्रश्नांची फी एकदाच सुरुवातीला स्वीकारतो.) नवग्रहांचे रत्ने, भाग्योदय यंत्रे, रुद्राक्ष इतर शुभवस्तू सुचवितो व अनुष्ठान करून दिले जातील. मुख्य कार्यालय श्री. सुधाकर सदानंद जोशी, दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ६. हस्तरेषा, ज्योतिषशास्त्र - कु. यशश्री सुधाकर जोशी, दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ६. योगी निवास बंगला, पहिला मजला, किसन क्रॉस रोड, नवीन पोलीस क्वार्टर्सजवळ, मालाड (पश्चिम), मुंबई-४०००६४. ९८२०५५३२७६/ ९८२०६१२५७८. (वरील पत्त्याशिवाय आमची कुठेही शाखा अथवा प्रतिनिधी नाहीत.)

0070800481-1

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइझिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.



**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
घनकचरा व्यवस्थापन विभाग
निविदा सूचना

ठाणे महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी घनकचऱ्याचे संकलन, वाहतुक व प्रकिया करणेकरीता वाहने भाडेतत्वावर घेणेकरीता ई-टेंडरिंग पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. सदरच्या कामाचे निविदा प्रपत्र www.mahatender.gov.in या वेबसाईटवर दि.२७/१०/२०२२ ते दि.१०/११/२०२२ पर्यंत १६.०० बाजेपर्यंत उपलब्ध असून प्राप्त निविदा दि.१४/११/२०२२ रोजी ११.०० वाजता किंवा निविदा उघडण्याची पुर्व सुचना देऊन निविदाकार अथवा त्यांच्या प्रतिनिधीसमोर उघडण्यात येतील. प्राप्त झालेली कोणतीही निविदा पूर्णत: अथवा अंशत: स्विकारणे अथवा नाकारण्याचे हक्क ठाणे महानगरपालिकेकडे राहतील.

ठामपा/पिआरओ/घकव्य/७०३/२०२२-२३ **सही/-**
दि:२५.१०.२०२२ उपआयुक्त
*plsvisitourofficialweb-site* घनकचरा व्यवस्थापन विभाग
*www.thanecity.gov.in* ठाणे महानगरपालिका, ठाणे

**संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !**



**नवी मुंबई महानगरपालिका**
**शिक्षण विभाग**
**फेर-निविदा सूचना क्र. नमुंमपा/शिक्षण विभाग/ 08 /2022-23**
**कामाचे नाव :- नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या English/CBSE बोर्डाच्या शाळांसाठी शिक्षक पुरवठा करणेकरीता NGO कडून विनंती प्रस्ताव मागविणेबाबत.**
**इसारा रक्कम 1% रु. :- 2,00,000/-**
**कोऱ्या निविदेची रक्कम रु. :- रु.5,000/- + रु. 900/- GST (18%)**
**Total Rs. 5900/-**
**फेर-निविदापुस्तिका ई-टेंडरिंग (E-tendering) संगणक प्रणालीच्या http://www.nmmc.maharashtra.etenders.in या संकेतस्थळावर होतील. निविदेचे सादरीकरण खालील तक्तात नमुद केल्याप्रमाणे https://nmmc.etenders.in या संकेत स्थळावर ऑनलाईन करण्याचे आहे**
**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे**

सही/-
**उप आयुक्त (शिक्षण)**
**नवी मुंबई महानगरपालिका**
जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/835/2022